www.dainikmahabharat.com RNI.NO.MAHMAR/2015/64418 jaymahabharat2015@gmail.com



# दैनिक जय महाभारत

संपादक–विजयकुमार वाव्हळ

केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री ना. श्री. रामदासजी आठवले साहेब यांनी शिवछत्र निवासस्थानी भेट दिली. शिवछत्र परिवाराच्यावतीने जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडित साहेब व मी त्यांचे हृदय स्वागत केले. यावेळी रिपाई युवकचे प्रदेशाध्यक्ष श्री. पप्पूजी कागदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र | बीड (महाराष्ट्र) | दैनिक | मराठी | वर्ष –१० | अंक – १९३ | सोमवार दि.२४ फेब्रुवारी २०२५ | किंमत २ रू | पाने ६



# धर्माची खिल्ली उडवणारे लोकगुलामगिरीच्या वृत्तीचे- मोदी

## कुंभावर प्रश्न करणाऱ्यांना पंतप्रधानांचे उत्तर

छत्तरपूर – 'धार्मिक परंपरांची खिल्ली उडवणारे लोक समाजात फूट पाडण्याचे काम करतात, असे लोक गुलामगिरी प्रवृत्तीची असतात,' अशी जोरदार टीका पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विरोधी पक्षावर केली. धार्मिक परंपरांची खिल्ली उडवल्यावरून त्यांनी विरोधकांचा समाचार घेतला. मध्य प्रदेशातील छत्तरपूर येथील बागेश्वर धाम येथे रविवारी ते बोलत होते. बालाजी कॅंसर इन्स्टिट्यूट अँड रिसर्च सेंटरचे डिजिटल भूमिपूजन त्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्रशास्त्रीही उपस्थित होते. मोदी म्हणाले, आजकाल काही नेते धर्माची खिल्ली उडवतात. त्यास कमी लेखतात. लोकांत फूट पाडण्याचे काम करतात. अनेकदा परदेशी शक्तीदेखील अशा लोकांचे समर्थन करते. यातून देश व धर्माला कमकुवत करण्याचा प्रयत्न असतो. हिंदूंच्या श्रद्धेचा तिरस्कार करणारे लोक अनेक शतकांपासून कोणत्या ना कोणत्या रूपात



राहिले आहेत.आयुष्मानसाठी पैसे मागितल्यास मला पत्राने कळवा ... मोदी म्हणाले, प्रत्येक गरिबाची मोफत उपचाराची सोय केली आहे. त्यासाठी आयुष्मान कार्ड बनवले आहे. हे कार्ड ऑनलाइन तयार होईल. त्यासाठी कुठेही पैसे देण्याची गरज नाही. परंतु कुणी पैसे मागितल्यास मला पत्राने कळवा. बाकीचे काम मी करून घेईल.

रुग्णालयाच्या भूमिपूजनाआधी मोदींनी बागेश्वर धामचे पं. धीरेंद्रशास्त्री यांच्या माता सरोजदेवींची भेट घेतली. मी चिठ्ठी काढली तर तुमच्या मनात मुलाचा विवाह व्हावा, अशी इच्छा असेल ना, असे मोदींनी त्यांना विचारले. त्यावर सरोज म्हणाल्या, होय. आता इच्छा तर अशीच आहे. मोदी म्हणाले, या वेळी बालाजींचे बोलावणे आले. ही हनुमंताची कृपा आहे. हे श्रद्धेचे धाम आता आरोग्य केंद्र बनले. १० एकरमध्ये हे केंद्र आहे. यात १०० खाटांची सुविधा असेल.

# मराठा आरक्षणासाठी बेमुदत उपोषण, ६५ फलक लावले:एलईडीवर रोज ४ तास मागण्यांचे सादरीकरण

छत्रपती संभाजीनगर – मराठा समाजाला कायदेशीर आरक्षण मिळण्यासाठी क्रांती चौकात बेमुदत उपोषण रविवारपासून सुरू झाले आहे. विविध १४ मागण्या पूर्ण करण्यासाठी हे उपोषण आहे. मागण्यांचे मंडपातून रोज एलइडीवर सादरीकरण केले जाणार आहे.

मराठा क्रांती मोर्चा–मराठा क्रांती ठोक मोर्चा, मराठा आरक्षण चिंतन आंदोलन समितीने मराठा समाजाच्या हक्कासाठी उपोषण सुरू केले. या वेळी आरक्षणाचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. राजेंद्र दाते, उच्च न्यायालय याचिकाकर्ते किशोर चव्हाण, मराठा क्रांती मोर्चा समन्वयक रवींद्र काळे हजर होते.

टिकणारे आरक्षण हवे

ओबीसीतून किंवा स्वतंत्र पण कोर्टात टिकणारे आरक्षण मराठा समाजाला राज्य सरकारने द्यावे, यासाठी लढा सुरू केला आहे. आता कायदेशीर आरक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे राज्य सरकारने कायदेशीर आणि कोर्टात टिकणारे आरक्षण द्यावे. –रमेश केरे, उपोषणकर्ते.

मुंडेंना सहआरोपी करा

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांना सहआरोपी करा, या मागणीसाठी मराठा क्रांती मोर्चाचे



समन्वयक नितीन कदम हे रविवारी उपोषणाला बसणार होते, परंतु पोलिसांनी उपोषणाची परवानगी नाकारली. असे कदम यांनी सांगितले.

# माजी मुख्यमंत्री आतिशी दिल्ली विधानसभेच्या विरोधी पक्षनेत्या

नवी दिल्ली : दिल्ली विधानसभेत विरोधी पक्षनेतेपदी माजी मुख्यमंत्री आतिशी यांची निवड करण्यात आली आहे. आज, रविवारी आम आदमी पार्टीच्या पक्ष मुख्यालयात झालेल्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. बैठकीत सर्व आमदारांनी आतिशी यांची विधिमंडळ पक्षनेते म्हणून निवड केली. त्यांच्या माध्यमातून दिल्ली विधानसभेला पहिल्या विरोधी पक्षनेत्या मिळाल्या आहेत.

आतिशी आता दिल्ली विधानसभेत विरोधी पक्षनेत्याची भूमिका बजावतील. त्या कालका मतदारसंघाच्या आमदार आहेत. आप सरकारमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या राजीनाम्यानंतर त्यांनी मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळली होती. मुख्यमंत्री म्हणून आतिशी यांच्या कामामुळे पक्षातही त्यांचा लौकिक वाढला आहे.

विधानसभा निवडणुकीत अरविंद केजरीवाल, मनीष सिसोदिया आणि सौरभ भारद्वाज



यांसारख्या दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला, मात्र आतिशी कालकाची आपली जागा वाचवण्यात यशस्वी झाल्या. पक्षातील एक मजबूत महिला चेहरा असल्याने, बैठकीत आतिशी यांचे नाव प्रस्तावित करण्यात आले होते.

# बालाजी तांदळेला थर्ड डिग्री दिल्यास सगळेच कळेल

## केवळ आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी तपास सुरु असल्याचे दाखवले - अंजली दमानिया

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेला आहे. पोलिसांना अद्यापही एक आरोपी सापडलेला नाही. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हे प्रकरण उचलून धरलेले आहे. आता अंजली दमानिया यांनी या प्रकरणाशी संबंधित एक्सवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टमधून अंजली दमानिया तपास यंत्रणांवर शंका उपस्थित केली आहे. पोलिसांचा तपास चालू आहे, हे आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी दाखवल्याचे त्या म्हणाल्या. हे प्रकरण लावून धरले नसते तर कराडला देखील अटक झाली नसती, असा दावाही त्यांनी केला. सध्या अंजली दमानिया यांची ही पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे.

अंजली दमानिया आपल्या सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हणाल्या, धनंजय मुंडे माझे दैवत, वाल्मीक कराड माझे नेते, असे म्हणणारे बाळाजी तांदळे यांना पत्र देऊन, त्यांना बरोबर घेऊन, त्यांच्याच जवळच्या मित्रांचा, जे खुनाचे आरोपी आहेत, ह्यांना घेऊन पोलिस शोध करू शकतात का? जे पकडले गेले, ते "मुद्दाम पकडवून, बळी दिले गेले"ह्यात शंका आहे का? म्हणूनच



कराड फरार राहू शकले आणि आपल्याला मूर्ख बनवण्यासाठी दाखवले गेले की पोलिसांचा तपास चालू आहे. जर प्रकरण लावून धरले नसते तर कराडला देखील अटक झाली नसती.

बालाजी तांदळे, जो जमिनीचा बंदोबस्त करतो, प्रत्येक स्थळी उपस्थित असतो, तो शोधले आरोपींना? ह्याची नुसती चौकशी करून त्याला सोडून दिले? असेही त्या म्हणाल्या. ह्याला जर थर्ड डिग्री वापरून चौकशी केली, तर कळेल सगळे कुणाच्या सांगण्यावरून होत होते. पीआय गोसावी आणि भागवत शेलार यांचे सीडीआर जाहीर करा, अशी मागणीही अंजली दमानिया यांनी केली. पहिल्या दोन आरोपींची TIP कुणाकडून आली? देवेंद्र फडणवीस आता तरी काही बोलणार का? अजून त्यांना गरज वाटत नाही? असा सवाल दमानिया यांनी उपस्थित केला.




# सर्वसामान्यांना झटका !

## खाद्यतेलाच्या दरात किलोमागे '5-6' रुपयांची वाढ

बीड | न्यूज पॉईंट

गेल्या काही महिन्यापासून खाद्यतेलाचं भाव गगनाला भिडले आहे. यामुळे सर्वसामान्यांचे किचन बजेट कोलमडले आहे. आता अशातच खाद्यतेलाच्या दरात किलोमागे पाच ते दहा रुपयांनी वाढ झाली आहे.हॉटेल व रस्त्यावर मिळणारा वडापाव, भजी, डोसे आदी पदार्थही महागण्याची शक्यता आहे. दरम्यान शेंगदाणा तेलाचे दर मात्र सध्या तरी स्थिर असल्याचे समोर येते आहे. देशातील नागरिक साधारणतः सोयाबीन, शेंगदाणे, सूर्यफूल व पामतेलाचे सेवन करतात. या पिकाचे उत्पादन यंदा कमी आहे. त्यामुळे आवक कमी आहे.त्यात केंद्र व राज्य सरकारने सोयाबीनसह सर्व पिकांच्या हमीभावात वाढ केली. सोयाबीन दरात वाढ झाली आहे. केंद्र सरकारने खाद्यतेलावर २० टक्के आयात शुल्क लावले आहे. त्यामुळे खाद्यतेलाच्या दरात वाढ झाली. दोन वर्षांपूर्वी देशात खाद्यतेलाचे दर वाढले होते. त्यावेळी सरकारने इतर देशातून पामतेल आणि इतर तेल आयात करण्याचे धोरण आखले. त्यामुळे देशांतर्गत खाद्यतेलाच्या किमती कमी झाल्या होत्या. आता केंद्राने सोयाबीनचा दर वाढवला.

### असे आहेत भाव?

सोयाबीन – 135 ते 140
सूर्यफूल – 155 ते 160
शेंगदाणा तेल – 160 ते 195
मोहरी – 170 ते 175



# मनोज जरांगेंना मस्साजोगच्या ग्रामस्थांचा धक्का ?

बीड | न्यूज पॉईंट

मोठी बातमी समोर येत आहे, आज भाजपा आमदार सुरेश धस हे मस्साजोगच्या दौऱ्यावर होते. या भेटीनंतर त्यांनी मोठा दावा केला आहे. हा मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे. या प्रकरणात सुरुवातीपासूनच मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि भाजप आमदार सुरेश धस यांनी आक्रमक भूमिका घेतली. मात्र त्यानंतर सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्या भेटीची बातमी समोर आली. या भेटीवरून मनोज जरांगे पाटील यांनी सुरेश धस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला होता.

त्यानंतर आता सुरेश धस यांनी आज मस्साजोगमध्ये जाऊन संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची तसेच तेथील ग्रामस्थांनी भेट घेतली. आपल्या भेटीनंतर त्यांनी मोठा दावा केला आहे. मस्साजोग येथील ग्रामस्थांनी आपल्याला पाठिंबा दिल्याचं त्यांनी म्हटलं आहे. एकीकडे मनोज जरांगे पाटील हे सुरेश धस यांच्यावर टीका करत असताना, दुसरीकडे धस यांच्या दाव्यानुसार मस्साजोगच्या ग्रामस्थांनी धस यांना दिलेला पाठिंबा हा मनोज जरांगे पाटील यांच्यासाठी मोठा धक्का असल्याची चर्चा आता सुरू झाली आहे.

मनोज जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया?

धनंजय मुंडे आणि आमदार सुरेश धस यांची भेट झाल्यानंतर तुम्ही टीका केली होती, मात्र ग्रामस्थांनी धस यांना पाठिंबा जाहीर केला आहे, असा प्रश्न यावेळी जरांगे पाटील यांना विचारण्यात आला. यावर त्यांची प्रतिक्रिया आता समोर आली आहे.

# सशक्त आणि उज्वल भारताच्या निर्मितीसाठी संतांचे साहित्य प्रेरणादायी

## इतिश्री राष्ट्र संत स्वामी गोविंद देव गिरि यांचे गौरवोद्गार

पुणे / प्रतिनिधी (दै.महाभारत)

विश्ववंदिता भारत देशाच्या निर्माण प्रक्रियेत संतांचे साहित्य हे वेदाचे सार असून ते जगाच्या कल्याणासाठी प्रेरक आहे असे प्रतिपादन श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष पू. स्वामी गोविंद देव गिरि यांनी केले. पुण्यातील मोशी येथील वेदश्री तपोवन इथे दासबोध सखोल अभ्यास फौंडेशन तर्फे आयोजित प.पू. स्वामींचा अमृत महोत्सवी सोहळा व अयोध्येतील वेदपाठ शाळेसाठी निधी अर्पण समारंभात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समर्थ रामदास स्वामी आणि उपक्रमाच्या संयोजक पूजनीय अक्का वेलणकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ओमकार जोशी यांनी सद्गुरु स्तवन या दासबोधातील समासाचे वाचन केले. पू. स्वामी गोविंददेव गिरि यांचा परिचय सौ वृंदा जोगळेकर यांनी करून दिला. दासबोध सखोल अभ्यास फाउंडेशन तर्फे स्वामी गोविंद देव गिरि यांचा शाल, श्रीफळ, वस्त्र, मानपत्र आणि रुपये अकरा लाख अकरा हजार एकशे अकरा निधी देऊन सत्कार करण्यात आला. ७६ दिव्यांनी त्यांचे औक्षण करण्यात आले. दासबोध सखोल अभ्यास परिवार तर्फे देण्यात आलेल्या या निधीचा विनियोग अयोध्येतील नियोजित समर्थ रामदास स्वामी वेदपाठ शाळेसाठी करणार असल्याचे स्वामी गोविंददेव गिरि यांनी सांगितले . या कार्यक्रमात भागवतातील गीते ( लेखिका निर्मलाताई देवस्थळी), दासबोधातील माणिक मोती (शीलाताई देशमुख), समर्थांची पत्रे आणि समर्थांचे उपदेश पर काव्य (विजय लाड ) तसेच गीतेतील नवविधा भक्ती ( पुष्पा प्रभुणे)आणि ज्ञानबोध ( विश्वनाथ प्रभुणे) या ग्रंथांचे प्रकाशन स्वामी गोविंददेव गिरि यांचे हस्ते करण्यात आले. फाउंडेशनचे संचालक विजय लाड यांनी प्रस्तावनेत संत रामदास स्वामींचा दासबोध जनमानसात सर्व दूर पोहोचवण्यासाठी डिजीटल तंत्रज्ञानाचे सहाय्य घेऊन दासबोध सखोल अभ्यास मंडळाने अपार परिश्रम घेतल्याचे सांगितले.प.पू. स्वामी गोविंद देव गिरि महाराजांनी समर्थांचे दासबोधातील विचार इतर ग्रंथा पेक्षा वेगळे व प्रभावी कसे हे अनेक संदर्भ देऊन सांगितले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ अपर्णा वांगीकर , सौ. मेधा कुलकर्णी, सौ.रंजना पाटील , अनिल वाकणकर , आनंद जोगळेकर, बाळासाहेब पाटील, सौ.माधवी पानसे, सौ. विनया आणि विनायक विद्वांस , विवेक थिटे यांनी परिश्रम घेतले. संतोष सप्रे यांनी संचालन केले . सौ. प्रीति जोशी यांनी कार्यक्रमाचे चित्रीकरण व देश, विदेशातील साधकांसाठी थेट प्रक्षेपण केले तर सौ. अंजली खळदकर यांनी पावन भिक्षा दे दो राम ही प्रार्थना गायली. सौ. शुभदा थिटे यांनी आभार प्रकटीकरण केले.







# महाशिवरात्री निमित्ताने तिसगाव येथे किर्तन महोत्सव व शिवलीला ग्रंथ पारायण सोहळा

निफाड ।रामभाऊ आवारे (दै. महाभारत)

सर्व धर्मानुरागी ईश्वर भक्तांना कळविण्यात आनंद वाटतो की, श्री क्षेत्र तिसगांव ता चांदवड जि नाशिक येथे श्री हृदयेश्वर भगवान महादेव मंदिर सातवे वर्धापनदिन महानपवित्रपर्वकाळ महाशिवरात्रीनिमित्त भव्य किर्तन महोत्सव प्रतिवर्षाप्रमाणे भगवंताच्या कृपेने,स्वामी जयदेवपुरीजी महाराज (चंद्रेश्वरगड, चांदवड), प.पु. वैष्णवभुषण सुजित महाराज (हरेकृष्ण बाबा देवस्थान, देवरगांव) ज्योतिष्यविशारद वै.ह.भ.प. मधुकर महाराज जाधव (जोपुळ) यांच्या आशिर्वादाने व ह.भ.प. माधव महाराज घोटेकर, खेडलेझुंगे यांच्या शुभप्रेरणेने व ह.भ.प. नवनाथ महाराज गांगुर्डे (विश्वस्त, संतश्रेष्ठ श्रीनिवृत्तीनाथ महाराज समाधी संस्थान, त्र्यंबकेश्वर) यांच्या कुशल मार्गदर्शनाने व समस्त ग्रामस्थ मंडळी यांच्या तन मन धनाच्या सहकायनि गांगुर्डे वस्ती श्री क्षेत्र तिसगांव (माळ्याचे) येथे महाशिवरात्री निमित भव्य किर्तन महोत्सव मिती माघ कृ. ११ सोमवार दि. २४/२/२०२५ से मिती माघ कृ. १४ गुरुवार दि. २७/२/२०२५ पर्यंत रोज सायं ०७ ते ०९ वा. संपत्र होणार आहे.यात पहाटे काकडा, सकाळी शिवलीलाग्रंथ पारायण सायं सामुदायिक हरिपाठ व रात्री ०७ ते ०९ वा. आज सोमवार धर्मचार्य ह.भ.प. वाल्मिक महाराज जाधव (ब्राह्मणगांव) मंगळवारी भागवताचार्य ह.भ.प. निलेश महाराज निकम (नांदगांव ता. निफाड) बुधवारी सकाळी धर्माचार्य ह.भ.प. निवृत्ती महाराज रायते (खडकमाळेगांव) महाशिवरात्री सायं आळंदी विद्याविभुषित ह.भ.प. किरण महाराज बोरसे (आळंदी देवाची)

गुरुवारी सकाळी १० ते १२ वा.वैराग्यमुर्ती ह.भ.प. पोपट महाराज कासारखेडेकर (जळगांव) यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तन होऊन नंतर महाप्रसादाने भव्य सोहळ्याची सांगता होईल.तरी सर्व भाविकांनी या परमार्थरूपी महाधनाचा अवश्य लाभ घ्यावा. असे आवाहन शिवभक्त ह.भ.प.लक्ष्मण कारभारी गांगुर्डे व शिवभक्त ह.भ.प.बाजीराव कारभारी गांगुर्डे, नवनाथ महाराज गांगुर्डे यांनी केले आहे.



# युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेकरिता सुर्डीच्या सौरभ जाधवची निवड

## आ. विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन दिल्या शुभेच्छा

गेवराई / प्रतिनिधी (दै. महाभारत)

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्डकप स्पर्धेसाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील सुर्डीच्या सौरभ जाधव यांची निवड झाली असून आ. विजयसिंह पंडित यांनी सौरभचा जाहीर सत्कार करून स्पर्धेसाठी जाणाऱ्या सौरभ जाधवचा गेवराई विधानसभा मतदार संघाला अभिमान आहे अशी प्रतिक्रिया विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिली.

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी थलेटीका फिटनेस, सूरत येथे वर्ल्ड कप निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते, त्यात भारतातील एकूण २६ राज्यातील कुडो राष्ट्रीय विजेत्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात बीड जिल्ह्यामधून महाराष्ट्र राज्यामार्फत गेवराई विधानसभा मतदारसंघातील मोजे सुर्डी येथील सौरभ जाधवची निवड करण्यात आली. युरोप येथे जून २०२५ मधे होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी सौरभची निवड झाली असून राष्ट्रीय कोच हांशी मेहुल वोरा यांच्या मार्गदर्शनाखा भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी युरोप येथे टीम इंडिया जाणार आहे. सोरभला प्रशिक्षक अरविंद मोरे, ज्ञानेश्वर गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. सौरभ जाधवची निवड झाल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी त्यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या क्रीडा क्षेत्रात चांगले वातावरण तयार होत सौरभ जाधवची निवड मतदारसंघासाठी अभिमानास्पद आहे असेही विजयसिंह पंडित यावेळी बोलताना म्हणाले. याप्रसंगी सुर्डीचे सरपंच महादेव सोळुंके, राम कुलकर्णी, अर्जुन कुलकर्णी, यश अतकरे, गणेश सुर्डीकर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ह.भ.प. रोहिणीताई गडकरी यांना समाजभूषण पुरस्कार

कळस येथील वारकरी संप्रदयातील ह.भ.प. रोहिणीताई गडकरी यांना महाराष्ट्र राज्य रामोशी बेरड समाजाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.रामोशी समाजातील पहिल्या महिला कीर्तनकार व प्रवचनकार म्हणून ह.भ.प. रोहिणीताई गडकरी यांनी काम सुरु केले आहे. समाजात प्रबोधनकार म्हणून त्यांचं कार्य असल्याने समाजाच्या वतीने पुणे येथे गौरव करण्यात आला.त्यांच्या या पुरस्काराबद्दल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कळस गावच्या वतीने सरपंच राजेंद्र गवांदे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ह.भ.प. गणेश महाराज वाकचौरे, जयकिसान दूध संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब वाकचौरे, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष नामदेव निसाळ, अगस्ती साखर कारखान्या चे संचालक सिताराम वाकचौरे, संगमनेर साखर कारखान्या चे संचालक संभाजी वाकचौरे, डी टी वाकचौरे, भरत वाकचौरे आदी उपस्थित होते.

ह.भ.प. रोहिणी गडकरी बोलताना म्हणाल्या की, समाजाच्या वतीने दिलेल्या पुरस्कारा पेक्षा गावच्या मातीचा सन्मान मला लाख मोला वाटतो. अध्यात्मिक अभ्यासाने जीवनात समाधान लाभते. वारसा नसताना देवाच्या आशीर्वादने धर्माचे कार्य होत आहे. असेही मत व्यक्त केले.

# जनकल्याण मराठी पत्रकार संघाची सटाणा येथे बैठक बागलाण व देवळा तालुका कार्यकारिणी जाहीर

निफाड ।रामभाऊ आवारे (दै. महाभारत)

जनकल्याण मराठी पत्रकार संघाची बागलाण तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असुन बागलाण तालुका अध्यक्ष पदी सचिन सोनवणे यांची निवड करण्यात आली आहे. काल सटाणा येथिल झालेल्या बैठकीत विविध पदाधिकारी यांची निवड करुन त्यांना विविध मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेची बुलंद तोफ अरविंद तात्या सोनवणे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वात्सल्य रुग्णालयाचे संचालक डॉ राहुल सोनवणे, जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष रफिक सैयद, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष देविदास बैरागी, राज्य प्रमुख सल्लागार अन्वर पठाण, महिला राज्य अध्यक्ष मनिषा पवार, अन्याय अत्याचार निवारण समिती च्या राज्य अध्यक्ष कल्याणी धोंडगे, पोलीस मित्र समिती चे राज्य अध्यक्ष आनंद दाणी, विश्वस्त गणेश खरोटे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी मालेगाव येथील सतीश खैरनार यांची तर नासिक जिल्हा उपाध्यक्ष पदी चेतन दाणी यांची तर जिल्हा संघटक पदी गणेश बागुल यांची तर जिल्हा सचिव पदी शशिकांत पवार यांची तर देवळा येथील आदिनाथ ठाकूर यांची जिल्हा सह सचिव पदी नियुक्ती करण्यात येवून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.

जनकल्याण मराठी पत्रकार संघ संचलीत आरोग्य निवारण समिती च्या राज्य अध्यक्षपदी डॉ राहुल सोनवणे यांची तर अन्याय अत्याचार निवारण समिती च्या राज्य उपाध्यक्ष पदी करुना पाटील यांची तर पोलीस मित्र समिती च्या राज्य उपाध्यक्ष पदी मंगेश भामरे यांची निवड करण्यात आली. जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या बागलाण तालुका कार्याध्यक्ष पदी प्रशांत भामरे यांची तर तालुका सचिव पदी संदिप गांगुर्डे यांची तर जगदीश बंधान यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर सुनिल वाघ यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर बाळू बागुल यांची मुल्हेर विभाग प्रमुख म्हणुन तर राजेंद्र वानले यांची ठेंगोडा विभाग प्रमुख म्हणुन तर गणेश खरोटे यांची बागलाण तालुका उपाध्यक्ष पदी तर संभाजी सावंत यांची नामपुर शहर अध्यक्ष पदी तर सुनिल निंकुंभ यांची शहर संघटक पदी तर अशोक शिंदे यांची साल्हेर विभाग प्रमुख तर निळकंठ जाधव यांची नासिक शहर संघटक पदी तर मनोज पिंगळे यांची सटाणा शहर अध्यक्ष पदी तर निळकंठ भालेराव यांची बागलाण तालुका उपाध्यक्ष पदी गोविंद ठाकरे यांची तालुका संघटक पदी एकमताने निवड करण्यात आली



देवळा तालुका जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी महादू मोरे यांची तर तालुका उपाध्यक्ष पदी जितेंद्र आमले यांची नियुक्ती करण्यात आली. पोलीस मित्र समिती च्या बागलाण तालुका अध्यक्ष पदी किशोर म्हसदे यांची तर तालुका उपाध्यक्ष पदी दिपक जाधव यांची तर गणेश सावंत यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर गणेश जाधव यांची तालुका उपाध्यक्ष पदी तर यांची निवड करुन नियुक्ती पत्र देण्यात आले. अन्याय अत्याचार निवारण समिती च्या बागलाण तालुका अध्यक्ष पदी वैशाली बिरारी यांची निवड करण्यात आली

या वेळी जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे उत्तर महाराष्ट्र उपाध्यक्ष मच्छिंद्र साळुंके, दिंडोरी तालुका अध्यक्ष सुरेश सुरासे, पोलीस मित्र समिती चे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिनेश पगारे, उपाध्यक्ष गोरख सोनवणे वामन शिंदे, हरि भास्कर नासिक शहर कार्याध्यक्ष किरण घायदार यांच्या सह अनेक पत्रकार उपस्थित होते

# रोटरी क्लब व संयुक्त मंगळवार पेठ हातकणंगले यांचेकडून रक्तदान शिबिर संपन्न

कुडूत्री / सुभाष चौगुले (दै.महाभारत)

प्रोजेक्ट इव्हेंट चेअरमन रो. अन्वेष बांदे (जी. पी. पारसिक बँक इचलकरंजी शाखा बँक मॅनेजर) यांच्या संकल्पनेतून रोटरी क्लब ऑफ हातकणंगले सेंट्रल, व संयुक्त मंगळवार पेठ हातकणंगले यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंतीचे औचित्य साधत रक्तदान शिबीर मोठया उत्साहात संपन्न. वारंवार रक्ताची भासणारी कमतरता लक्षात घेऊन रोटरी क्लब हातकणंगले सेंट्रल, व संयुक्त मंगळवार पेठ हातकणंगले यांनी एक सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबीर आयोजित केले होते. आतापर्यंत रोटरीने २०२४- २०२५ या सालामध्ये ४ वेळा रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले होते. व १८० हून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले.असे रोटरी चे अध्यक्ष रो.वसंत हापटे यांनी आपले मनोगतामध्ये बोलताना सांगितले तसेच रोटरीने आतापर्यंत डोळे तपासणी शिबीर, आरोग्य शिबीर, शालेय उपक्रम राबवले आहेत. यापुढेही असेच उपक्रम राबवून समाजसेवा करू असे रोटरीचे अध्यक्ष वसंत आपटे म्हणाले. आभार प्रदर्शन रोटरीचे माजी सेक्रेटरी रो.मिलिंद प्रभू यांनी मानले यावेळी उपस्थित संयुक्त मंगळवार पेठ हातकणंगले मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व सर्व सदस्य, रोटरी चे सचिव रो. संभाजी पाटील, रो. प्रवीण बेडक्याळे, रो.तानाजी चोपडे, रो. सागर भुजबळ, सर्व रोटरी सदस्य डॉक्टर्स व ग्रामस्थ उपस्थित होते





# संत गाडगेबाबांनी स्वच्छतेतून समृद्धीकडे तर संत रविदासांनी

## संसारातून परमार्थाचा मार्ग दाखविला – वसुदेव बप्पा गायकवाड

केज/प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी संत गाडगेबाबा व संत रविदास यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,माजी प्राचार्य,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते,व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड हे होते.उत्स्फुर्त भाषण कृष्णा गिरी,ऋषीकेश कोळसे,यश गायकवाड यांनी केले.अध्यक्षीय समारोप करताना संत गाडगेबाबांनी स्वच्छतेतून समृद्धीकडे तर संत रविदास यांनी संसारातून परमार्थाकडे जाण्याचा मार्ग दाखविल्याचे




# केज पंचायत समिती मध्ये पंतप्रधान आवास योजना ग्रामीण टप्पा ०२ चे मंजुरी पत्र व पहिला हप्ता वाटप

केज/प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचा महत्वकांक्षी प्रकल्प सामान्य बेघर लोकांना नवीन घर हा संकल्प शनीवारी पूर्ण झाला.महाराष्ट्रातील वीस लाख निराधारांना एकाच वेळी घर देण्याचे स्वप्न शनीवारी काल पूर्ण झाले. दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्रात एकाच वेळी सर्व ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषदच्या सर्व कार्यालया मध्ये दहा लाख लाभार्थींना पंतप्रधान आवास योजनेचा पहिला हप्ता त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,ग्रामविकास मंत्री जयदीप गोरे यांच्या उपस्थितीत बालेवाडीपुणे येथे पार पडला.एकाच वेळी दहा लाख लाभार्थ्यांना डीबीटी प्रणालीद्वारे त्यांच्या खात्यात पैसे टाकण्यात आले.अशा प्रकारचा इतिहासात नोंद राहील असा कार्यक्रम हा पहिल्यांदाच महाराष्ट्रात घेण्यात आला.ग्रामीण भागातील दुसऱ्या टप्प्याच्या या कार्यक्रमात उर्वरित दहा लाखलोकांना पण लवकरच निधी वितरित करण्यात येणार आहे.तसेच जे लोक या यादीत नाहीत त्यांचा पण पुन्हा सर्वे लवकरच करण्यात येणार आहे असे पंतप्रधान कार्यालया ने कळवले आहे.शंभर दिवसाच्या या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करून तालुक्यातील ४७१६ लाभार्थ्यांना निधी देण्याचे काम केज पंचायतसमिती ने केले असून त्यांच्या या कामाचे कौतुक करण्यात आले.केजच्या गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाने मॅडम,अतिरिक्त गटविकास अधिकारी श्री. राठोड यांनी उत्कृष्ट नियोजन करून १५० ते २०० लाभार्थींना प्राथमिक स्वरूपात मंजुरी पत्र देण्यात आले.



या कार्यक्रमास केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिताताई मुंडदा यांचे प्रतिनिधी कृषी उत्पन्न बाजार समिती चे उपसभापती डॉ.वासुदेव नेहरकर, भाजपा तालुका अध्यक्ष भगवान केदार,भाजपा जेष्ठ नेते सुनील आबा गलांडे

# जैन महिला परिषदेच्या आरोग्य तपासणी शिबिरास प्रचंड प्रतिसाद

## कोल्हापूर-सांगली जिल्ह्यातील नामांकित रुग्णालयांकडून तपासणी

शिरोळ ।आनंदा शिंगे
(दै.महाभारत)

जागतिक महिला दिनानिमित्त दक्षिण भारत जैन सभा, कर्मवीर आरोग्य अभियान, जैन महिला परिषद व वीर महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरास प्रचंड प्रतिसाद मिळाला. या शिबिरात २७५० पेक्षा अधिक महिलांनी तपासणी करुन घेतले.

शरद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, यड्राव (इचलकरंजी) येथे झालेल्या शिबिराचे उदघाटन आमदार डॉ. राजेंद्र पाटील यड्रावकर व मान्यवरांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दक्षिण भारत जैन सभेचे अध्यक्ष भालचंद्र पाटील होते.


यावेळी आमदार यड्रावकर म्हणाले, 'महिलांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. महिलेचे आरोग्य निरोगी तर संपूर्ण कुटुंब निरोगी. त्यांनी आपले शारिरीक व मानसिक आरोग्य सांभाळावे. जैन महिला परिषद आरोग्य तपासणी शिबिराच्या माध्यमातून तपासणी व त्यानंतरचे उपचार होणार आहेत. सभेने प्रत्येकवर्षी प्रत्येक विभागात असे शिबिर आयोजित करुन महिलांचे आरोग्य सक्षम करावे.'




यावेळी अध्यक्ष भालचंद्र पाटील म्हणाले, 'प्रत्येक वर्षी सांगली, कोल्हापूर व कर्नाटक विभागात अशा शिबिराचे आयोजन करण्यात येईल. त्याचा खूप मोठा फायदा सर्वच महिलांना होईल. सभेत महिलांचा सहभाग वाढावा यासाठी आपण सर्वजण प्रयत्न करु. सभा आता पंचकल्याण पूजेतून काही रक्कम देणगी रुपातून घेवून गरजू विद्यार्थ्यांना दत्तक-पालक योजनेतून शिष्यवृत्ती देत आहे. यासाठी संपूर्ण जैन समाज, मुनीवृंद, पंचकल्याणक समिती यांचे मोठे सहकार्य लाभत आहे.'

यावेळी स्वागत व प्रास्ताविक जैन महिला परिषदेच्या अध्यक्षा सौ. स्वरुपा पाटील यड्रावकर यांनी केले. सूत्रसंचालन सुजाता मगदूम यांनी केले. आभार कर्मवीर आरोग्य अभियानाचे डॉ. देवपाल बरगाले यांनी मानले. यावेळी गावा-गावातून बसमधून महिला तपासणीसाठी आल्या होत्या. यावेळी मेडिसिन, स्त्रिरोग, अस्थीरोग, शस्त्रक्रिया, नेत्ररोग, कान-नाक-घसा, रक्त, क्षयरोग अशा विविध तपासणी व आयुर्वेद, होमीपॅथी उपचाराची सुविधा शिबिरात करण्यात आली होती.

यावेळी दक्षिण भारत जैन सभेचे चेअरमन रावसाहेब पाटील, खजिनदार संजय शेटे, ट्रस्टी राजेंद्र झेले, ट्रस्टी अनिल बागणे, महामंत्री दादासाहेब पाटील-चिचंवाडकर, सौ. विजया पाटील, सौ. सुरेखा पाटील, आयुष सेवाभावी संस्थेचे अमोल पाटील, आयजीएमच्या डॉ. भाग्यरेखा पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पांडूरंग खटावकर यांच्यासह दक्षिण भारत जैन सभा, जैन महिला परिषद, वीर महिला मंडळ, शरद इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजीचे प्राध्यापक-सेवक, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व शासकिय आरोग्य केंद्र व शासकिय योजना उपलब्ध असणारे रुग्णालये व त्याचा स्टाफ उपस्थीत होते.



# राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त संत गाडगेबाबाना अभिवादन,

सुधाकर जेठे ।फुलंब्री
(दै.महाभारत)

तालुक्यातील आदर्श किनगाव येथे कर्मयोग राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या प्रतिमेस सरपंच सौ मनीषा चव्हाण यांनी पुष्पहार अर्पण करून महाआरती करण्यात आली. बाळासाहेब शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करीत गाडगेबाबांची प्रेरणा घेवून समाजसेवेला सुरवात केली आहे.बाबांचे प्रेरणादाई विचार संत गाडगे बाबांचे प्रेरणादायी विचार.अडाणी राहू नका, मुला-बाळांना शिकावा,जो वेळेवर जय मिळवतो तो जगावरही जय मिळवतो,दगड धोंड्यांची पूजा करण्यात वेळ आणि शक्ती वाया घालवू नका,दान घेण्यासाठी हात पसरू नका, दान देण्यासाठी हात पसरा,दु:खाचे डोंगर चढल्याशिवाय सुखाचे किरण दिसत नाही,धर्माच्या नावाखाली कोंबड्या बकऱ्या सारखे मुके प्राणी बळी देवू नका,माणसाचे खरोखर देव कोण असतील तर ते आई बाप,माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागावे हाच बोध मी ग्रहण केला आहे,शिक्षणाने माणसाचे जीवन फुलते आपण ह्या जगात कशासाठी आलोत हे कळते,शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे उपस्थिताना बाळासाहेब शिंदे यांनी गाडगेबाबा यांचे विचार सांगीतले.यावेळी उपस्थित रमेश चव्हाण देवनाथ सोनवणे सुभाष चव्हाण भाऊसाहेब चव्हाण अनिल चव्हाण नितीन वाघ कल्याण चव्हाण सुनील चव्हाण पद्माकर तावडे सुरेश चव्हाण बाळासाहेब साळवे बबनराव चव्हाण तातेराव चव्हाण सुदामराव तांदळे या कार्यक्रमासाठी शांताराम सोनवणे प्रकाश साळवे पंडित त्रिभुवन सतीश पवार तंटामुक्ती अध्यक्ष किशोर सोनवणे यांनी परिश्रम घेतले तरी या कार्यक्रमाचे आयोजन बाळासाहेब शिंदे यांनी केले

# अनु.जाती उपवर्गीकरण विधेयक महाराष्ट्र सरकारने मंजूर करावे

## महामोर्चात सहभागी होण्याचे अण्णा धगाटे यांचे कंधार येथे आवाहन

कंधार । प्रतिनिधी
(दै.महाभारत)

अनुसूचित जाती उपवर्गीकरण विधेयक महाराष्ट्र सरकारने मंजूर करावे.या मागणीसाठी दि.५ मार्च रोजी आझाद मैदान मुंबई येथे मांगवीर महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे.तरी सकल मातंग व तत्सम वंचित जात समुहाच्या समाज बांधवांनी या महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक विचारवंत अण्णा धगाटे( पुणे) यांनी कंधार येथे आयोजित बैठकीत बोलताना केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल व निर्देशानुसार राज्यातील अनु. जातीतील मागास अशा मातंग व तत्सम वंचित जात समुहाच्या मागणीनुसार अनुसूचित जाती आरक्षणाची पद्धत निश्चित करण्याठी राज्य सरकारने न्यायमूर्ती बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीचा अहवाल घेऊन व महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या सर्व अभ्यास समितीचा शासनाकडे असलेल्या अहवाला आधारे अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण महाराष्ट्र राज्यात मंजूर करावे. हरियाणा, पंजाब, कर्नाटक व तेलंगणा, आंध्रपदेश आदी राज्यांनी अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक पारित करत, आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजुर केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकाल व निर्देशानुसार महाराष्ट्रातही अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक मंजुर करावे.आणि सामाजिक न्यायाची प्रक्रिया सुरू करावी.



अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजुरीचा तातडीने कायदा पारित करावा.या मागणीसाठी दलित महासंघ,लालसेना, अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलन आणि समविचारी संघटनेने मुंबई येथे मांगवीर महामोर्चाचे आयोजन ५ मार्च रोजी केले आहे.त्यात समाजातील बुद्धीवादी, सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे,समाज बांधवांनी संजय ताकतोडे यांचे बलिदान विचारात घेऊन सर्वांनी महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक विचारवंत अण्णा धगाटे यांनी बैठकीत केले.

यावेळी अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे, उपाध्यक्ष परमेश्वर बंडेवार यांनीही बैठकीत मार्गदर्शन केले.बैठकीच्या अध्यक्षस्थानी मनोहर वाघमारे होते. यावेळी जिल्हा प्रमुख नागेश तादलापूरकर,माजी पंचायत समिती सदस्य रामभाऊ देवकांबळे,पंडीत देवकांबळे, बाबुराव बसवंते, विनायक मोरे , सोपान कांबळे,विश्वाभंर बसवंते,विनय मोरे आदीसह मोठ्या संख्येने समाज बांधवाची उपस्थिती होती.

# राज्यातील कर्मचाऱ्याचा शासनाच्या विरोधात तीव्र असंतोष- बळीराम उबाळे, अशोक चव्हाण

गेवराई / प्रतिनिधी
(दै.महाभारत)

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चीलबुले साहेब व सर्व संघटनाचे निमंत्रक मा. विश्वास काटकर साहेब, सचिव संजय महालंकर, व इतर संघटनेच्या मान्यवरांनी दिनांक १७/०२/२०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना देवेन्द्रजी फडणवीस साहेब यांना राज्य कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचे रखडलेल्या मागण्या व राज्य भरातील कर्मचारी व शिक्षकांचा असंतोष असल्याचे निवेदन देण्यात आले आहे. विधानसभा अस्तित्वात येऊन ३ महिने झालेले आहेत मंत्रीमंडळाचे कामे गतिमान पद्धतीने चालू आहेत परंतु कर्मचाऱ्याच्या मागण्या बाबत शासन दुर्लक्ष करीत आहे, अशी धारणा हळू हळू महाराष्ट्रात तयार होऊ लागली आहे. कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्याकडे शासनाने सकारात्मक दृष्टीने पाहिले आहे .खालील रास्त मागण्या शासनाने त्वरित मंजूर कराव्यात. १) दिनांक १ जुलै २०२४ पासूनचा ३% महागाई भत्ता तात्काळ मंजूर करावा. २) दिनांक १ जुलै २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी नुसार देय घरभाडे भत्ताची पुनर्रचना करावी. ३) वेतन त्रुटी दूर करण्याससत्व मा. खुल्लर समितीचा अहवाल सत्वर प्रसिद्ध करावा. ४) सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना १ मार्च २०२४ पासूनच्या अंबलबजावणी संदर्भातील अटी शर्ती नियम व कार्यपद्धती निश्चित करणारे शासन आदेश/ परीपत्रक सत्वर पारित करावा. व इतर महत्त्वाच्या मागण्याही प्रलंबित आहेत. राज्य शासनाने येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी उपरोक्त मागण्या मंजूर कराव्यात नसता राज्यातील १७ लाख कर्मचारी शिक्षकांची नाराजी वाढणार आहे. त्यामुळे शासनाने कर्मचारीभिमुख धोरण स्वीकारून तात्काळ मागण्या मंजूर कराव्यात. अशी मागणी बीड जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बळीराम उबाळे, सचिव नंदकिशोर परळकर, उपाध्यक्ष अशोक चव्हाण, कार्याध्यक्ष संभाजी जाधव, कार्याध्यक्ष शिवलाल राठोड, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संघटनाचे राज्य उपाध्यक्ष ओंकार उबाळे, सचिव रुपेश कोकीळ, अध्यक्ष सचिन तांदळे, आरोग्य संघटनेचे भरत नागरगोजे, आरोग्य म.अध्यक्ष आशाताई धुतमल, जी.प कर्मचारी अध्यक्ष प्रदीप राठोड, लेखा अध्यक्ष कृष्णा वैरागे. कोषाध्यक्ष उमेश हूलजुते, सहसचिव प्रदीप बनकर, क.आ भागवत वाघ, प्रवक्ता चक्रधर हेंद्रे, मकरध्वज सावंत, उत्तरेश्र्वर जाधव,विलास बहिरवाल, अनिल गोरे, अर्जुन शेळके. इत्यादींनी केली आहे



# शेलूबाजार येथे महाआरोग्य व रक्तदान शिबिर संपन्न

मंगरूळपीर (दै.महाभारत)

श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त शेलूबाजार येथील नवीन गजानन महाराज मंदिरात महाआरोग्य व रोग निदान शिबिर तसेच रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन आमदार भावनाताई गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशन आणि आरोग्यदूत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून मोफत औषध वितरण केले. सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत चाललेल्या या शिबिराला मोठ्या संख्येने नागरिकांनी प्रतिसाद दिला. वाशिम व मंगरूळपीरचे आमदार श्यामभाऊ खोडे यांनी शिबिराला भेट दिली.शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी शिवसेना तालुकाप्रमुख मनीष पाटील गहुले, एस. आर. कॉन्व्हेंटचे संचालक उद्धव राऊत व शीतल राऊत, सोनाळा गावचे सरपंच राहुलभाऊ वानखडे, शालिनीताई वानखडे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष शहरप्रमुख शेख नवेद, सौ. दुर्गाताई दुगाणे, शिवसेना महिला जिल्हाप्रमुख वैशालीताई, संस्कार गुरुदेव महिला मंडळ, गजानन महाराज नित्यसेवा मंडळ, साई श्रद्धा नित्यसेवा योग कार्यशाळा आणि मारवाडी युवा मंच शेलूबाजार मंडळ यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले.



या उपक्रमात अनेक युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. कार्यक्रमाला शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाळू पाटील ठाकरे, उपतालुकाप्रमुख रविभाऊ लांभाडे, बजरंगसिंह रघुवंशी तसेच शिवसेनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत फुलंब्री तालुक्यातील २२ गावांचा होणार कायापालट

सुधाकर जेठे / फुलंब्री
(दै.महाभारत)

फुलंब्री तहसील कार्यालय मध्ये पोखरा एक दिवसीय कार्यशाळा आयोजित पाणी फाऊंडेशन आणि कृषी विभाग, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने पोकरा प्रकल्पासाठी निवड झालेल्या २२ गावांच्या सरपंच व ग्राम विकास समितीची मार्गदर्शनपर कार्यशाळा तहसील सभागृह फुलंब्री येथे संपन्न झाली. पोखरा मध्ये खुप योजना आहे त्या कसे घ्यायचे यासदर्भात गावामधे समिती नेमून दिलेले आहे ते काम करतील. पाणी फाऊंडेशनचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. अविनाश पोळ साहेब यांनी पोकरा प्रकल्पाच्या संधींबद्दल सखोल मार्गदर्शन केले. २२ गावांसाठी विशेष अभ्यास दौऱ्याचे नियोजन करून प्रगतिशील शेतीच्या दिशेने पुढे जाण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. याप्रसंगी आमदार सौ. अनुराधाताई चव्हाण, डॉ. अविनाश पोळ सर, पुणे बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता श्री. अतुल चव्हाण साहेब, श्री. सांडू आण्णा जाधव, श्री. शिवाजीराव पाथ्रीकर, श्री. सर्जेराव मेटे, श्री. कल्याण चव्हाण, कृषी अधिकारी भारत कासार, सरपंच समित्या, कृषी सहायक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बीड जिल्हा पत्रकार संघाच्या आष्टी तालुकाध्यक्षपदी प्रविण पोकळे यांची नियुक्ती

आष्टी / अशोक मुटकुळे
(दै.महाभारत)

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने नुकत्याच जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या तालुका अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून यामध्ये आष्टी तालुकाध्यक्ष पदी प्रविण राम पोकळे यांची नियुक्ती केली आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे.पत्रकार प्रविण पोकळे यांची तालुका अध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचे लोकनेते आ.सुरेश धस,माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ.बाळासाहेब आजबे,माजी आ.साहेबराव दरेकर,युवा नेते जयदत्त धस, युवा नेते सागर धस,जि. प.माऊली जरांगे,नगराध्यक्ष जिया बेग,गणेश शिंदे, उद्योजक बंडू तोडकर,आष्टी तालुका पत्रकार संघ,आष्टी तालुका युवा पत्रकार संघ, पुरोगामी पत्रकार संघ,प्रेस क्लब, बेलगाव ग्रामस्थ,मित्रपरिवार यांच्यासह राजकीय, सामाजिक,व्यापारी सर्व क्षेत्रातून अभिनंदन होत असून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.



# श्रुती हनवते पीएचडी साठी ठरली पात्र

सेनगाव / गणेश सुतार
(दै.महाभारत)

सेनगाव तालुक्यातील सुकळी बुद्रुक या गावातील श्रुती गौतम हणवते(सिरसाट) हि पहिल्याच प्रयत्नात पीएचडी पात्र ठरली आहे.तिचे महाविद्यालयीन शिक्षण हिंगोली येथील आदर्श महाविद्यालय येथे झाले असून तीने पहिल्याच प्रयत्नात पीएचडी (झकऊ) डॉक्टर ऑफ फिलोसोफी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करून कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे.तीने पुढील शिक्षणासाठी व संशोधनासाठी न्यूरो सायन्स(छशीीेलळशपलश)म्हणजेच (मानवी मेंदूचा अभ्यास) तसेच कॅन्सर सारख्या विषयांमध्ये रुची दाखवली आहे. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# शिवसेना सदस्य नोंदणी अभियान प्रारंभ तसेच शिवसेना शिंदे गटाची बैठक

शिर्डी / संजय महाजन
(दै.महाभारत)

शिवसेना( शिंदे गट) सदस्य नोंदणी अभियान अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये शिवसेना सदस्य नोंदणी प्रमुख व शिवसेना उपनेते आणि नाशिक जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांच्या उपस्थितीत सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह शिर्डी येथे प्रारंभ करण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त युवकांनी, शिवप्रेमींनी ,महिलांनी, युवतींनी शिवसेना सदस्य नोंदणी करून घ्यावी व या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे .असे आवाहान अहिल्यानगर उत्तर जिल्हा प्रमुख कमलाकर कोते व नितीनराव औताडे यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेना ,महिला आघाडी, युवा सेना व सर्व अंगीकृत संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक तसेच शिवकार्य शिवसेना नोंदणी ही शिवसेनेचे उपनेते अजयजी बोरस्ते,मा.खा. सदाशिव लोखंडे आमदार विठ्ठलराव लंघे ,आमदार अमोल खताळ, प्रभाकर शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी अकरा वाजता शासकीय विश्रामगृह शिर्डी येथे होणार आहे.

तरी या बैठकीला व नोंदणी अभियान प्रारंभ कार्यक्रमासाठी शिवसेनेच्या सर्व अंगीकृत संघटनेच्या शाखा पदाधिकाऱ्यांनी ,सदस्यांनी , युवक ,युवती व शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन अहिल्यानगरचे उत्तर नगर जिल्हा प्रमुख कमलाकर कोते तसेच नितीनराव औताडे यांनी या पत्रकाद्वारे केले आहे.

# बहुजन भीम पँथर सामाजिक संघटनेचा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

कोपरगाव/ बिपीन गायकवाड
(दै.महाभारत)

कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देवी येथे रविवार दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी बहुजन भीम पँथर सामाजिक संघटनेचा दुसरा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात व सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला.याप्रसंगी माहेगाव देवी येथे बहुजन भीन पँथर या शाखेच्या फलकाचे अनावरण करण्यात आले त्यानंतर शालेय विद्यार्थ्यांचा सत्कार व निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा पार पडला यावेळी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौध्द महासभेचे अहिल्यानगर जिल्हा संघटक व कोपरगाव तालुक्याचे पालकमंत्री बौध्दाचार्य बिपिन गायकवाड हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भीम आर्मी संघटनेचे महाराष्ट्र निरीक्षक दिपकभाऊ भालेराव,वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हाध्यक्ष प्रवीण भाऊ आल्हाट,तसेच



अविनाश अहिरे, सुनील मोकळ,पत्रकार विशाल लोंढे, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार इब्राहिम उर्फ मुन्नाभाई शेख यांच्या नेतृत्वाखाली हा सोहळा यशस्वी झाला. तसेच संघटनेचे सहसचिव भारत चक्रनारायण, महाराष्ट्र राज्य प्रवक्ता कासम भाई शेख, उत्तर महाराष्ट्र संपर्क प्रमुख बाबासाहेब मोकळ,महाराष्ट्र कार्याध्यक्ष सुधाकर पाईक, महिला आघाडीच्या संपर्क प्रमुख जयश्री भोसले, अल्पसंख्याक युवा जिल्हाध्यक्ष मुकद्दर खाटीक, आत्माराम हिंगमिरे, तालुका अध्यक्ष अश्विनी वाघ, शाखा अध्यक्ष छाया मोरे, अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष साजिद सय्यद,असलम शेख यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित उपस्थित मान्यवरांचा शाल श्रीफळ व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला त्यानंतर संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,मायगाव देवी येथे निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक परिवर्तन,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, समता व बंधुता यासारख्या विषयांवर उत्कृष्ट निबंध सादर केले. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या बक्षिसांसह सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी बौध्दाचार्य बिपीन गायकवाड म्हणाले की बहुजन भीम पँथर सामाजिक संघटना ही सामाजिक परिवर्तन,शैक्षणिक प्रबोधन, वंचित घटकांचे सशक्तीकरण आणि संविधानिक मूल्यांच्या प्रचार व प्रसारासाठी सतत कार्यरत आहे. दोन वर्षांच्या अल्प काळातच संघटनेने विविध उपक्रम राबवत समाजात एक नवा विचार जागृत करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले आहे. या संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार इब्राहिम उर्फ मुन्नाभाई शेख यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक न्याय आणि समतेच्या दिशेने भरीव कार्य केले असे गायकवाड शेवटी म्हणाले सदरचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



## रंगपंचमीसाठी केशरी फुलांचे आगमन

### ग्रामीण भागात फुलली पळसाची झाडे

शाम गिराम(सिंधीकाळेगाव)

जालना तालुक्यातील सिंधीकाळेगाव येथील रंगपंचमीपुर्वीच परिसरात बहरले पळस.रंगपंचमीच्या पर्यावरण नैसर्गिक रंग म्हणून अनेक ठिकाणी पळसाच्या फुलांचा वापर केला जातो.पळसाडे झाड केशरी रंगाच्या फुलांनी बहरल्याचे चित्र दिसत आहे.लाल केशरी रंगाने सुंदर अनुभव येत आहे लाल केशरी रंगाच्या फुलांनी बहरलेली पळसाची झाडे सध्या सर्वांचे लक्ष वेधुन घेत आहे.रंगपंचमी हा एक सण आहे. फाल्गुन कृष्ण पंचमी या तिथीला रंगपंचमी हा सण साजरा केला जातो.धुलिवंदनापासून सुरू होणाऱ्या वसंतोत्सवाला रंगपंचमीच्या दिवशी पाच दिवस पूर्ण होतात. रंग पंचमी म्हणजे सण. या दिवशी एकमेकांना वेगवेगळे रंग लावून आनंदोत्सव साजरा केला जातो.पळसाची फुले पाण्यात टाकून स्नान केले तर त्वचारोग नाहीसा होतो, असेही आयुर्वेदात म्हटले आहे. पळसाच्या बियांचाही औषधीसाठी वापर केला जातो. सध्या तर रंगपंचमीची चाहुल लागल्याने पळस हे वृक्ष फुलोरा पांघरूण नटलेला दिसत आहे.

सिंधीकाळेगाव परिसरात पळस फुलला आहे.लाल.केशरी रंगाच्या फुलांनी बहरलेली पळसाची झाडे येणाऱ्या जाणाऱ्याचे लक्ष वेधून घेत आहे.

(छायाचित्र; शाम गिराम सिंधीकाळेगाव)



## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतलेल्या परीक्षांमध्ये तलवाडा येथील मा श्री अक्षय अशोक आठवले यांची

# ओबीसी सेलच्या सहाय्यक कक्ष अधिकारी म्हणून मंत्रालयात नियुक्ती

तलवाडा / आर आर आबा बहिर

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती मा श्री अशोक रावजी आठवले साहेब यांचे चिरंजीव अक्षय आठवले यांची मंत्रालय मध्ये नियुक्ती झाली आहे. त्याप्रसंगी माजी जिल्हा सदस्य सुरेशराव हात्ते साहेब यांच्या वतीने त्वरितापुरी महाविद्यालय येथे सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

त्या प्रसंगी उपस्थित माननीय श्री सुरेशराव हात्ते साहेब माननीय श्री शाहूरावजी आवटे माननीय श्री माऊली डोंगरे माननीय श्री मोहन डोंगरे पत्रकार आर आर आबा माननीय श्री अंबादास आठवले मा श्री विनोद आठवले मा श्री विकास करडे माननीय श्री बाबुरावजी शिंगणे माननीय श्री चोरमले सर माननीय श्री जाधव सर माननीय श्री खरसाडे सर माननीय श्री खंडागळे सर श्याम कुऱ्हाडे इतर मान्यवर उपस्थित होते..

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या ग्रामीण टप्पा-२ च्या लाभार्थ्यांना प्रा.टी.पी.मुंडे व शिवशैल्या मुंडे यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे वाटप!

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने तसेच पंचायत समिती परळी वैजनाथ आणि ग्रामपंचायत कार्यालय मांडेखेल यांच्यावतीने प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण भाग टप्पा दोनच्या लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सर व मांडेखेल ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. शिवशैल्या त्रिंबक मुंडे यांच्या शुभहस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी बोलताना ओबीसी नेते प्रा.टी.पी.मुंडे सर यांनी म्हटले की, शासनाच्या विविध योजना ग्रामपंचायत मार्फत अतिशय प्रभावीपणे राबवल्या जातात. त्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजना, रमाई घरकुल योजना, जलसिंचन विहिरी, शेततळे, गाय गोठे आदिसह विविध योजना राबविल्या जातात आणि त्याचा लाभ सामान्य



नागरिकापर्यंत पोहोचवला जातो. ग्रामपंचायत मार्फत विविध विकास कामे अतिशय दर्जेदार पद्धतीने केले जातात म्हणून अशा प्रकारच्या योजनांचा भविष्यातही नागरिकांनी लाभ घ्यावा तसेच मंजूर लाभार्थ्यांनी आपली कामे दर्जेदार पद्धतीने करावीत असे आवाहन त्यांनी लाभार्थ्यांना केले.

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने गावातील लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे वाटप करणे यासाठी परिपत्रक काढले त्या अंतर्गत पंचायत समिती परळी वैजनाथ आणि ग्रामपंचायत कार्यालय मांडेखेल यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कार्यालया जवळील हनुमान मंदिर येथे करण्यात आले होते. एकूण १५३ प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुला पैकी ५२ घरकुल मंजूर झाले त्या सर्वांना मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले. मांडेखेल ग्रामपंचायत ही शासनाच्या विविध योजनेचा लाभ लाभार्थ्यांना मिळवून देण्यात तालुक्यात अग्रगण्य आहे. शासनाच्या विविध योजना अतिशय प्रभावीपणे सरपंच राबवतात. त्याचा लाभ सामान्य गरजूवंत लोकांपर्यंत पोहोचण्याचे कार्य ग्रामपंचायत च्या वतीने केले जाते.

यावेळी प्रा.विजय मुंडे, गावातील ज्येष्ठ नागरिक विनायक नागरगोजे, माधवराव दादा नागरगोजे, वाल्मीक नागरगोजे, उपसरपंच प्रमिलाबाई नागरगोजे,ग्रामपंचायत सदस्य भागवत नागरगोजे, रामधन घुगे, विद्या राधाकिशन व्हावळे, मधुकर आश्रुबा नागरगोजे, आप्पाराव व्हावळे, गजेंद्र राठोड, दगडूबाई नागरगोजे, सुशीला साहेबराव घुगे, सरपंच माजी सरपंच काशिनाथ मुंडे, बालासाहेब घुगे, वैजनाथ नागरगोजे,ग्रामसभेचे सचिव म्हणून जि.प. मुख्याध्यापक आढाव सर व संगणक परिचारक ऑपरेटर माऊली होळंबे आदीसह लाभार्थी आणि गावातील नागरिक महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकाच्या अवयव दानाने ८ जणांना जीवदान मिळते -डॉ. राजेश सेठिया

## समृद्धी ग्रुपतर्फे अवयवदानाबाबत जनजागृती अभियान

मृत्यूपश्चात अवयवदान किती वेळेत व्हावे?

मृत्यू पश्चात अवयव दान किती वेळेत केले जावे, याबाबतचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. त्यानुसार हृदय व फुफ्फुस ४ ते ८ तासात, यकृत ६ ते १२ तास, मूत्रपिंड ३० तास, आतडे आणि स्वादुपिंड ६ तास, पांढऱ्या पेशी ३ दिवस, कातडी नसा, हृदयाच्या झडपा, डोळे २४, हाडे ३-४ दिवस या कालावधीत झालेल्या अवयव दानाचे यशस्वी प्रत्यारोपण होऊ शकते. नेत्रदानाकडे जनतेचा कल बऱ्यापैकी वाढला आहे. मात्र नेत्रदानापूर्वी मृतदेह एसी, शीत शवपेटी अथवा पंख्याखाली ठेवू नये. त्यामुळे नेत्र शुष्क बनून प्रत्यारोपणासाठी अडचणी निर्माण होतात, अशी माहिती डॉ. सेठीया यांनी दिली.

जालना/लक्ष्मण बिलोरे
( दै.महाभारत)

अवयव दान हे समाजासाठी एक अमूल्य योगदान आहे. आपणही अवयव दानाचा संकल्प करून कोणाच्यातरी आयुष्यात प्रकाश आणू शकतो. मेंदूमृत झालेल्या एका व्यक्तीचे हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे, आतडे आणि स्वादुपिंड, मूत्रपिंड यांसारखे अवयव गरजू रुग्णांना प्रत्यारोपणासाठी दिल्याने ८ जणांना जीवदान मिळते. शिवाय ७५जणांचे जीवनमान अप्रत्यक्षरीत्या सुधरू शकते. मृत्यूनंतरही कोणाला नवा जन्म देण्याची संधी आपल्या हाती आहे. हे कार्य अत्यंत पवित्र आणि मानवतेला सहाय्य करणारे असल्याने व्यापक प्रमाणात जनजागृती होऊन अवयवदान लोकचळवळ बनली पाहिजे, अशी प्रतिपादन रुबी हॉस्पिटलचे संचालक व मधुमेहतज्ञ डॉ. राजेश सेठिया यांनी येथे बोलताना केले.

येथील समृद्धी ग्रुपच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकातील गुरु गणेश मंगल कार्यालयात २१ फेब्रुवारी रोजी अवयव दानाचे महत्त्व या विषयावर आयोजित जनजागृतीपर व्याख्यानात डॉ. सेठिया बोलत होते. व्यासपीठावर समृद्धी ग्रुपच्या अध्यक्ष स्वाती मांडोत, सचिव सुरेखा श्रीश्रीमाल, कोषाध्यक्ष संगीता खिवंसरा, सल्लागार तथा प्रकल्प प्रमुख पुनम सुराणा, सहप्रकल्प प्रमुख डॉ. उमा गादिया गादिया, राणी कुचेरिया, प्रीती खिवंसरा, मनीषा काठेड यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. सेठिया यांनी पुराणकालीन कथांचा संदर्भ देत अनादी काळापासून चालत आलेल्या अवयव दानाची महती विशद केली. महर्षी दधीची ऋषींनी मानवतेच्या रक्षणासाठी स्वतःचा प्राण त्याग करून आपली हाडे देवांना दान केली. त्या हाडापासून इंद्राचे वज्रायुध, अर्जुनाचे गांडीव, रामाचे सारंग तर शिवाचे पिनाक हे प्रभावी अस्त्र बनले आणि त्यांनी त्या माध्यमातून मानवतेचे रक्षण केले. आपणही अवयव दानाचा संकल्प करून कोणाच्यातरी आयुष्यात प्रकाश आणू शकतो. मृत्यूनंतरही कोणाला नवा जन्म देण्याची संधी आपल्या हाती आहे. अवयव दान जिवंतपणी आणि मृत्यूनंतर अशा दोन प्रकारे करता येते. जिवंतपणी एक किडनी, एक फुफ्फुस आणि स्वादुपिंड, यकृत आतड्याचा एक भाग दान करता येतो. मृत्यु पश्चात डोळे, दोन किडनी, दोन फुफ्फुस, हृदय, मूत्रपिंड हाडे, कातडी, त्वचा, नसा, पांढऱ्या पेशी आणि चेहरादेखील दान करता येतो, असे सांगून डॉ. सेठिया म्हणाले की, भारतात १९४८ मध्ये पहिले अवयव दान झाले. नेत्रतज्ञ डॉ. आरईएस मुथ्थया यांनी सर्वप्रथम नेत्र प्रत्यारोपण केले. पहिले हृदयरोपण ३ऑगस्ट १९९८ रोजी एम्सचे डॉ. वेणूगोपाल आणि त्यांच्या टीमने देवीराम या व्यक्तीवर केले. त्यानंतर हा व्यक्ती २१ वर्षे जिवंत राहिला. त्यामुळेच भारतात ३ ऑगस्ट हा अवयव दान दिन म्हणून साजरा केला जातो. यावर्षीच्या अवयव दान दिनाची थीम इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे कारण तुम्ही बनवू शकता ही होती. भारतात पहिले यकृत दान ललिता रघुराम या २८ वर्षीय पत्नीने आपल्या पतीसाठी केले आणि या दोघांचा संसार सुखी बनला. यावर आधारित ये जिंदगी हा चित्रपट निघालेला






आहे, अशी माहिती देऊन डॉ.सेठिया म्हणाले की, कोणत्याही वयात अवयव दान करता येते. १०० मिनिटे वयाच्या जन्मजात बालकाचे आणि ९५ वर्षीय व्यक्तीचे किडनी दान, १०७ वर्ष व्यक्तीचे नेत्रदान आणि इतरांवर प्रत्यारोपण यशस्वी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. दुर्धर आजार असलातरी अशा व्यक्तींचे अवयव दान वैद्यकीय क्षेत्रातील संशोधनाच्या कामी येऊ शकते. संशोधन झाले तरच विज्ञान पुढे सरकेल. त्यामुळे अवयव दान चळवळ सुरू राहिली पाहिजे, असे ते म्हणाले.

प्रत्येकवर्षी प्रत्यारोपणासाठी दीड ते दोन लाख किडनींची मागणी असते. प्रत्यक्षात मात्र चार टक्के किडनी दान होते. यकृताची मागणी ८० हजार असताना फक्त १८०० उपलब्ध होते. केंद्र सरकारच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या सन २०२१ च्या अहवालानुसार दरवर्षी रस्ते अपघातात दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात. त्यातून फक्त ५५० जणांचे अवयव दान होते. मागणीच्या तुलनेत अत्यंत कमी अवयदान होत असल्याने गरजूंना प्राणास मुकावे लागते. अवयदानाचे सर्वाधिक प्रमाण स्पेनमध्ये आहे. तेथे १ कोटी मागे ३५०, अमेरिकेत २१९, इंग्लंडमध्ये १५० तर भारतात एक कोटी मागे फक्त ६ याप्रमाणे अवयव दानाचे प्रमाण आहे. आपण मृत्यू पश्चात अवयवदानाच्या माध्यमातून गरजूंना जीवनदान देऊ शकतो. त्यासाठी केंद्र सरकारच्या आरोग्य परिवार कल्याण मंत्रालयांतर्गत नोटो तर राज्य सरकारच्या सोटो आणि इतर अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अथवा ऑफलाइन अवयव दान संकल्पपत्र भरून देता येते. आपला एक संकल्प आठ ते दहा जणांना जीवनदान देऊ शकतो, अनेकांचे जीवन सुधरू शकतो, अशी साद डॉ. राजेश सेठिया यांना घेतली आणि या चळवळीसाठी समृद्धी ग्रुपला आपली सदैव साथ राहील, अशी ग्वाही दिली.

प्रास्ताविकपर भाषणात स्वाती मांडोत म्हणाल्या की, महिलांनी घराबाहेर पडून काहीतरी करावे, आपल्यातील कर्तृत्व दाखवावे यासाठी, ६० महिलांचा समृद्धी ग्रुप स्थापन करून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. अवयवदान जनजागृती हा पहिला आरोग्यविषयक उपक्रम आम्ही हाती घेतला असून, त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

### बेधडक

**बचाव...!**

मार्चच्या पूर्वसंध्येलाच आली
उष्णतेची जीवघेणी लहर,
त्यामुळे होऊ लागलाय
सर्वांच्याच अंगी कहर...!

काम तर चुकणार नाही पण
डोक्याला कपडा गुंडाळावा
लागेल,
काम करताना उष्णतेपासून
बचाव करावा लागेल...!!



प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

# मुलीच्या लग्नासाठी पाच हजाराची आर्थिक मदत - बालासाहेब जगतकर

एक हात मदतीचा उपक्रम
परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

परळी शहरातील तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र च्या वतीने मुलीच्या आई-वडिलास पाच हजार रुपयाची आर्थिक मदत करण्यात आली असल्याची माहिती तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष साप्ताहिक मानपत्रचे संपादक व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की गेल्या वर्षभरापासून परळी शहरातील तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र च्या वतीने परळी शहरातील भीम नगर साठे नगर रमा नगर व प्रबुद्ध नगर या विभागातील मुलीच्या लग्नास परळी शहरातील तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र च्या वतीने एक हात मदतीचा म्हणून मुलीच्या लग्नासाठी मुलीच्या आई वडीलास पाच हजार रुपयाची आर्थिक मदत करण्यात येत असून याचाच एक भाग म्हणून आज दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी साठे नगर येथील चिरंजीव सौ काक्षणी वैष्णवी बंडू शेषराव मस्के. राहणार साठे नगर यांचा परळी शहरातील काळाराम मंदिर संस्थान अंबेवेस परळी वैजनाथ जिल्हा बीड येथे विवाह संपन्न झाला असून यावेळी मुलीचे आई-वडील श्री बंडू शेषराव मस्के व शकुंतला बंडू मस्के यांच्याकडे ५००० रुपयाची आर्थिक मदत



करण्यात आली असून यावेळी तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व साप्ताहिक मानपत्र चे संपादक व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जगतकर ,ज्येष्ठ मार्गदर्शक उत्तम समुद्रे, राष्ट्रवादीचे युवक नेते रमेश मस्के गणेश मस्के. ऋषी शिरसागर बबन मस्के संजय शिंदे इत्यादीसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब जगतकर यांचा मस्के परिवाराच्या वतीने पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला असून या नववधूवरास संस्थेच्या वतीने शुभेच्छा ही देण्यात आल्या असल्याची माहिती ही तक्षशिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष साप्ताहिक मानपत्र चे संपादक व वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जगतकर यांनी दिली आहे.

# महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी बौद्धजन संघर्ष समितीच्या वतीने परळीत तीव्र निदर्शने

परळी / विकास वाघमारे
(दै.महाभारत)

संपूर्ण जगातील बौद्धांचे पवित्र स्थळ असलेले बिहार मधील बुद्ध गया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या व इतर मागणीसाठी बौद्धजन संघर्ष समिती परळीच्या वतीने उपविभागीय कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली .व याप्रकरणी तहसीलदार यांच्यामार्फत राष्ट्रपतींना निवेदन देण्यात आले.

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार ट्रस्टवर जे बौद्ध धर्मीय नाहीत अशां उच्चवर्णीयांचा समावेश करण्यात आला आहे. भारतातील लोकशाही व्यवस्थेनुसार ज्या धर्मियांचे धार्मिक स्थळे आहेत तेथे त्याच धर्मीयांच्या ती स्थळे ताब्यात आहेत.त्यामुळे या महाविहाराचे व्यवस्थापन संपूर्ण बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी गेल्या १० दिवसांपासून देश विदेशातील बौद्ध भिक्खू व बौद्ध अनुयायांनी उपोषण सुरू केले आहे.या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी परळीतील बौद्धजन संघर्ष समितीच्या वतीने नुकतेच दिनांक २१ फेब्रुवारी रोजी परळी उपविभागीय कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.




यावेळी बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे,बीटी अक्ट १९४९ रद्द करावा अन्यथा राज्यात लवकरच तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही या निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.परळी तहसील कार्यालयाच्या नायब तहसीलदार परवीन पठाण मॅडम यांनी निवेदन स्वीकारले. या निदर्शनात बौध्दजन संघर्ष समितीचे पदाधिकारी, बौद्ध उपासक, उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




**अंबाजोगाई / सालेम पठान**
**(दै. महाभारत)**

**अंबाजोगाई येथील शासकीय रेस्ट हाऊस या ठिकाणी महाराष्ट्र पोलीस मित्र संघटनेची बैठक पार पडली. या वेळी महाराष्ट्र पोलीस मित्र संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिनेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत बीड जिल्हा पोलीस मित्र संघटना बीड जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून, अंबेजोगाई तालुक्यांतील बरदापुर येथील सामजिक कार्यकर्ते, सर्वसामान्यांच्या अडीअडचणीला धावून जाणारे रोफ आतार यांची निवड नियुक्तीपत्र देऊन करण्यात आली. रोफ अत्तार यांच्या निवडीबद्दल राजकीय सामाजिक शैक्षणिक पत्रकारिता क्षेत्रातील लोकांच्या वतीने अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.**

# महेश बेदरे यांना मौलाना आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार प्रदान

प्रा.एस खंडागळे /पाटोदा
(दै.महाभारत)

पाटोदा येथील पत्रकार महेश श्रीरंग बेदरे यांना दैनिक दिव्य वार्ता व सायन दैनिक कश्मकश परिवाराच्या वतीने दिला जाणारा मानाचा असावा मौलाना आझाद राज्यस्तरीय आदर्श पत्रकारिता पुरस्कार २०२५ शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी बीड येथे झालेल्या भव्य सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ संपादक अबू बकर व संपूर्ण निवड समितीच्या वतीने यंदाच्या पुरस्कारासाठी पत्रकार महेश बेदरे यांचे नाव जाहीर करण्यात आले होते शनिवारी सायंकाळी बीड या ठिकाणी कोहिनूर लान्स येथे झालेल्या भव्य समारंभात आमदार इद्रीस नाईकवाडी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काजी यांच्यासह संपादक अबू बकर मौलाना शफिक शेख काझमी मुक्ती अब्दुल्लाह कासमी, संपादक संतोष मानूरकर हाफिज जाकिर सिद्दिकी, सलीम जहांगीर यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पत्रकार महेश बेदरे यांना सन्मानचिन्ह व मानपत्र असा पुरस्कार प्रदान करण्यात आला याप्रसंगी कुटुंबीयांसह पाटोदा पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे पत्रकार हमीद खान पठाण शेख महेश्वर शेख जावेद श्रीकांत धसे राजू भाई पठाण सचिन शिंदे रवींद्र गुंड यांच्यासह मित्रपरिवार व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती महेश बेदरे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




# संचित कर्म व साधनेमुळे मनुष्य व वास्तू आनंदी राहू शकते–श्री. दुष्यंत पाटील

इचलकरंजी/ संभाजी गुरव
(दै.महाभारत)

प्रत्येकास आपल्या हक्काचे घर असावे असे वाटते. परंतु त्या घरात राहणारी माणसे व ती वास्तू आनंदी किंवा दुखी राहू शकते. याचे कारण त्या घरातील माणसांचे संचित कर्म व त्यांची कर्म साधना. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात चांगले आचार, विचार, चांगली कर्म साधना अंमलात आणली तर तो मनुष्य व त्याचे राहते घर हे आनंदी बनते. त्याचबरोबर कोणतीही वास्तू बांधताना मध्यभागी ब्रह्मस्थान ठेवून त्याच्या अनुषंगाने आपले स्वयंपाक घर, बेडरुम, कार्यालय, टॉयलेट इ.ची रचना केल्यास ती वास्तू वैज्ञानिक दृष्टिकोनातून परिपूर्ण होते. तसेच रिकाम्या जागेला देखील वास्तुशास्त्राचे नियम लागू असतात. त्याचा अभ्यास करून जागा खरेदी करावी. हे सर्व करताना प्रशिक्षित व अभ्यासू वास्तू कन्सल्टंटची मदत घ्यावी, असे आवाहन कोल्हापूर येथील प्रसिद्ध विद्यावाचास्पती व वास्तु कन्सल्टंट डॉ.श्री. दुष्यंत पाटील यांनी काढले. ते रोटरी सेंट्रल एक्झिक्यूटिव्ह प्रोबस क्लब तर्फे आयोजित वैज्ञानिक दृष्टिकोनातून आनंदी वास्तू या विषयावर व्याख्यान देताना प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.




प्रारंभी प्रास्ताविक व स्वागत सेक्रेटरी रामचंद्र निमणकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रोबस क्लब ऑफ कोल्हापूरचे माजी अध्यक्ष श्री. सुरेश लोले यांनी केला. पाहुण्यांचा सत्कार प्रोजेक्ट कमिटी चेअरमन सुनील कोष्टी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपस्थितानी विचारलेल्या विविध प्रश्नांची समर्पक उत्तरे श्री. पाटील यांनी दिली. या निमित्ताने सहसचिव सौ. प्रमोदिणी देशमाने यांना पोलीस मित्र या संस्थेतर्फे हिरकणी पुरस्कार मिळाल्याबद्दल, तसेच माजी अध्यक्ष श्री. शिवबसू खोत यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा पाहुण्यांचे हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष श्री. प्रकाशराव सातपुते, श्री. नरेंद्र पाध्ये, जुगलकिशोर तिवारी, काशिनाथ जगदाळे, डॉक्टर भालचंद्र सूर्यवंशी, विजय हावळे, हिमांशू मिरगे, प्रदीप लडगे, बाबासाहेब पाटील, डॉ. कुबेर मगदूम, ज्ञानदेव मेटे, बाळासाहेब हवले, प्रमोद लाटणे, विजय पवार, किरण कटके, अरुण केटकाळे, कुमार मानकापूरे, विनायक चव्हाण, आनंद वाळवेकर, सौ. सुनीता निमणकर, सौ. शैलजा मिरगे, सौ. संगीता लडगे, सौ. माधवी कुलकर्णी इत्यादी मान्यवर व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने हजर होते.

# कुरुंदवाडच्या बाजारात आंब्याचे आगमन झाले , लिलाव प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद

शिरोळ ।दै.महाभारत

कुरुंदवाडच्या बाजारात आंब्याचे आगमन झाले असून, लिलाव प्रक्रियेलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. येथील हजरत दौलतशहा बाजार समितीत पहिल्या टप्प्यात दाखल झालेल्या आंब्याचा लिलाव आमदार डॉ. राजेंद्र पाटील-यड्रॉवकर यांच्या हस्ते बोली लावून करण्यात आला.पहिल्या पेटीचा ४ हजार रुपये असा उच्चाक लिलाव झाला.




लिलावाच्या शुभारंभप्रसंगी आमदार डॉ. राजेंद्र पाटील यांनी श्रीफळ वाढवून पहिल्या आंबा पेटीचा लिलाव काढला यावेळी ते म्हणाले कोकणातील शेतकऱ्यांनी मेहनतीने उत्पादित केलेला आंबा आता बाजारात येत असून, त्याला योग्य दर मिळावा यासाठी बाजार समिती आणि व्यापाऱ्यांनी सहकार्य करावे. यावेळी बोलताना व्यापारी बाळू बागवान म्हणाले पहिल्या टप्प्यात आलेल्या आंब्याला चांगली मागणी असून, पुढील काही आठवड्यांत आणखी मोठ्या प्रमाणावर आंबा बाजारात येईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला. आंब्याचा रंग, चव आणि सुगंध लक्षात घेता यंदा बाजारात स्पर्धात्मक दर राहतील, असे सांगितले. लिलाव प्रक्रियेत महंमद गुलाबहसेन बागवान,हाजी महंमद हसन महंमदगौस बागवान अल्ताफ बागवान,समीर कोल्हापूरे,असिफ बागवान सहभाग घेतला.कुरुंदवाड बाजारपेठेतील हा आंब्याचा हंगाम यशस्वी होईल आणि सर्वांना लाभदायक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष दादासाहेब पाटील,तानाजी आलासे, उमेश कर्णाळे,आर्षद बागवान, मुन्ना कोल्हापुरे,फय्याज बागवान, वहिद इचलकरंजे,राजू वडगावे,शहानवाज बागवान,युनूस बागवान,सुलेमान बागवान, जिआउद्दीन बागवान,आवेस बागवान भरत टोणे,सद्दाम तहसीलदार आदी उपस्थित होते.

# तहसिल कार्यालयात राष्ट्रसंत संत श्री. गाडगेबाबा महाराज यांची शिपाई व कोतवाल ने केली जयंती साजरी, अधिकारी कर्मचाऱ्यांची दांडी

सोयगांव / संदीप इंगळे
(दै. महाभारत)

तहसिल कार्यालयात राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीला निवासी तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी दांडी मारल्याने नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. राष्ट्रभक्त, महापुरुष यांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यासंदर्भात शासनाने आदेशीत केले आहे. सुटीच्या दिवशी येणारी जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यासाठी शासकीय कार्यालयात अधिकारी हजर राहत नसल्याचा सोयगाव तालुक्याचा इतिहास झाला आहे. या प्रकाराकडे राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केल्याने जयंती, पुण्यतिथी साजरी करणेस अधिकारी येत नसल्याने शिपाई व एखादी कर्मचारी फक्त देखावा म्हणून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती, पुण्यतिथी साजरी केल्याचे फोटो वरिष्ठांना पाठवत आहे. यामुळे नागरिकांमधून अधिकाऱ्यांविषयी संताप व्यक्त केला जात आहे. दरम्यान राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांची जयंती तहसिल कार्यालयात साजरी करतांना तहसिल कार्यालयाचे शिपाई संतोष नवगिरे व कोतवाल मनोज आगे हे दोघे उपस्थित होते. राष्ट्रसंत गाडगेबाबा महाराज यांच्या प्रतिमेस शिपाई संतोष नवगिरे यांच्याहस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करीत अभिवादन करण्यात आले यावेळी कोतवाल मनोज आगे उपस्थित होते तर चार नायब तहसीलदार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी दांडी मारली होती. जिल्हाधिकारी यांच्याकडून कारवाई होत नसल्याने तालुक्यात अधिकारी व कर्मचाऱ्यांची मनमानी सुरू आहे.याबाबत काय कारवाई केली जाते हा सद्या तालुक्यात चर्चेचा विषय ठरला आहे.



# अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारा विरोधात आमरण उपोषण

## विविध मागण्यांसाठी आज सोमवार पासून सामाजिक कार्यकर्ते संदीप इंगळे यांचे सोयगाव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण

सोयगाव / संदीप इंगळे
(दै. महाभारत)

प्रशासनाला दिलेल्या विनंती व तक्रारी अर्जावर कारवाई करण्यात व अधिकारी व कर्मचारी यांच्या मनमानी धोरणामुळे सोयगाव तालुक्यात सर्रासपणे रात्री बेरात्री गौनखनिज चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर महसूलचे भरारी पथक व पोलीस प्रशासन आर्थिक व्यवहारातून कारवाई करीत नसल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. हा बुडणारा महसूल अधिकाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल करण्यात यावा यासह विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते संदीप इंगळे दि. २४ सोमवारी तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी, सामजिक कार्यकर्ते संदीप इंगळे यांनी वनविभाग, पंचायत समिती, पोलीस प्रशासन व महसूल भरारी पथक, उपविभागीय अधिकारी सिल्लोड, ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना भ्रमणध्वनीद्वारे, सोशल मीडियाच्या माध्यमातून अवैधरीत्या वृक्षतोड, तालुक्यात होत असलेल्या गौनखनिज चोरटी वाहतूक, जरंडी ग्रामपंचायत च्या ग्रामविकास अधिकारी सुनिल मंगरुळे यांनी गौनखनिज वाहतुकीस दिलेले नाहरकत, तलाठी, मंडळ अधिकारी यांनी आर्थिक हितसंबंधातून कारवाईस केलेली टाळाटाळ व तहसीलदार यांनी कर्मचाऱ्यांची केलेली पाठराखण यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल सोयगाव तालुक्यात अधिकारी व माफियांच्या संगनमताने बुडविला जात आहे. या प्रकाराबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी,



ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांच्याकडे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून बुडालेला महसूल मासिक वेतनातून वसूल करण्यात यावा यासह वेळोवेळी दिलेल्या लेखी तक्रारी संदर्भात तहसीलदार यांनी काय कारवाई केली याबाबत तक्रारदारास अवगत करण्यात आले नाही. याबाबत तहसीलदार व संबंधित अधिकारी कर्मचारी यांची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी दि. १३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली होती. यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी व ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी संबंधित प्रकरणाबाबत अद्यापही अधिकारी, कर्मचारी यांची चौकशी करून कारवाई करण्यात आली नसल्याने दि. २४ सोमवारी तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे दि. १८ रोजी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड हे चौकशी करून कारवाई करतात की राजकीय दबावाचे बळी पडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# तहसील कार्यालयात अधिकारी व कर्मचारी यांनी मनमानी कारभारा विरोधात आमरण उपोषण

## सामाजिक कार्यकर्ते संदीप इंगळे यांचे विविध मागण्यांसाठी सोमवारी सोयगाव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण


सोयगाव (संदीप इंगळे)

प्रशासनाला दिलेल्या विनंती व तक्रारी अर्जावर कारवाई करण्यात व अधिकारी व कर्मचारी यांच्या मनमानी धोरणामुळे सोयगाव तालुक्यात सर्रासपणे रात्री बेरात्री गौनखनिज चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर महसूलचे भरारी पथक व पोलीस प्रशासन आर्थिक व्यवहारातून कारवाई करीत नसल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत आहे. हा बुडणारा महसूल अधिकाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल करण्यात यावा यासह विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते संदीप इंगळे दि. २४ सोमवारी तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी, सामजिक कार्यकर्ते संदीप इंगळे यांनी वनविभाग, पंचायत समिती, पोलीस प्रशासन व महसूल भरारी पथक, उपविभागीय अधिकारी सिल्लोड, ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांना भ्रमणध्वनीद्वारे, सोशल मीडियाच्या माध्यमातून अवैधरीत्या वृक्षतोड, तालुक्यात होत असलेल्या गौनखनिज चोरटी वाहतूक, जरंडी ग्रामपंचायत च्या ग्रामविकास अधिकारी सुनिल मंगरुळे यांनी गौनखनिज वाहतुकीस दिलेले नाहरकत, तलाठी, मंडळ अधिकारी यांनी आर्थिक हितसंबंधातून कारवाईस केलेली टाळाटाळ व तहसीलदार यांनी कर्मचाऱ्यांची केलेली पाठराखण यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल सोयगाव तालुक्यात अधिकारी व माफियांच्या संगनमताने बुडविला जात आहे. या प्रकाराबाबत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड यांच्याकडे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून बुडालेला महसूल मासिक वेतनातून वसूल करण्यात यावा यासह वेळोवेळी दिलेल्या लेखी तक्रारी संदर्भात तहसीलदार यांनी काय कारवाई केली याबाबत तक्रारदारास अवगत करण्यात आले नाही. याबाबत तहसीलदार व संबंधित अधिकारी कर्मचारी यांची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी दि. १३ फेब्रुवारी रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली होती. यामुळे तालुक्यात खळबळ उडाली आहे. जिल्हाधिकारी व ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी संबंधित प्रकरणाबाबत अद्यापही अधिकारी, कर्मचारी यांची चौकशी करून कारवाई करण्यात आली नसल्याने दि. २४ सोमवारी तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण करणार असल्याचे दि. १८ रोजी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व ग्रामीण पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड हे चौकशी करून कारवाई करतात की राजकीय दबावाचे बळी पडतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

# धानोरा (खुर्द) चे माजी सरपंच सुरेश जगताप यांना मातृशोक

अंबाजोगाई / सालेम पठान
(दै. महाभारत)

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा खुर्द येथील माजी सरपंच सुरेश जगताप यांच्या मातोश्री शारदाबाई बब्रुवान जगताप वय (७०) यांचे अल्पशा आजाराने रविवार ता.२३ रात्री दीड वाजता निधन झाले.दरम्यान अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा (खुर्द) चे माजी सरपंच सुरेश जगताप यांच्या त्या मातोश्री होत्या , शारदाबाई जगताप या बोलक्या व मनमिळाउ स्वभावाच्या होत्या . त्यांच्या पश्चात तीन मुले मुलगी नातवंडे असा परिवार आहे. गावातील समशानभूमीत त्यांच्यावर रविवार रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील नागरिक नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# इचलकरंजीत वीरशैव उत्कर्ष लिंगायत मंडळाची स्थापना

लिंगायत समाजाची बैठक
इचलकरंजी/ संभाजी गुरव
(दै.महाभारत)



लिंगायत समाजाच्या विकासासाठी नवीन वीरशैव लिंगायत उत्कर्ष मंडळ स्थापन करण्याचा एकमुखी निर्णय आज झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत घेण्यात आला. समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शासनदरबारी प्रभावी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तसेच, लिंगायत समाजाचा व्यापक मेळावा लवकरच आयोजित करून समाजाच्या प्रगतीसाठी ठोस दिशा ठरवण्याचा निर्णय झाला.

ही बैठक आज जिजामाता मार्केट, गायत्री भवनजवळ येथे झाली. अशोकराव स्वामी (आण्णा) यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत लिंगायत समाजाच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. माजी नगरसेवक प्रकाश पाटील, ॲड. विजय हावळे, बाळासाहेब पाटील यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

जगत ज्योती बसवेश्वरांचा पुतळा लवकरात लवकर बसवणे,लिंगायत समाज रुद्रभूमीचे नूतनीकरण आणि सर्व सुविधांचा विकास, रुद्रभूमी, मंदिरे आणि शिक्षण मंडळाच्या माध्यमातून समाजातील इतर घटकांनाही सामावून घेणे, लिंगायत समाजातील जइउ दाखल्यांसाठी शासनदरबारी प्रयत्न, लिंगायत धर्माला स्वतंत्र धर्म म्हणून मान्यता मिळवण्यासाठी प्रयत्न आणि अल्पसंख्याक दर्जाची मागणी, शासनाच्या योजनांचा लाभ समाजातील सर्व घटकांना मिळावा यासाठी प्रयत्नशील राहणे, लिंगायत समाजाच्या युवकांसाठी नोकरी आणि व्यवसायासाठी सवलती मिळवण्याची मागणी यासह समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.या बैठकीत मार्गदर्शन करताना अशोकराव स्वामी यांनी स्पष्ट केले की, ही बैठक कोणत्याही व्यक्ती किंवा संघटनेच्या विरोधात नसून लिंगायत समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आहे. समाजातील सर्व घटकांना संधी मिळावी, त्यांना सामाजिक आणि शैक्षणिक स्तरावर न्याय मिळावा, तसेच समाज संघटित राहून शासनदरबारी आपल्या मागण्या प्रभावीपणे मांडू शकेल, यासाठी नव्या संघटनेची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. लिंगायत समाजात ४० हून अधिक जाती आणि ३५० हून अधिक पोटजाती असल्याने समाज विखुरला गेला आहे. त्यामुळे समाजाला सरकारी योजनांपासून शैक्षणिक आणि औद्योगिक सवलतींपर्यंत अनेक बाबतीत मागे राहावे लागले आहे. या सर्व अडचणी दूर करण्यासाठी नव्या संघटनेच्या माध्यमातून ठोस प्रयत्न केले जातील, असे ठरवण्यात आले.

या बैठकीत लिंगायत समाजाच्या व्यापक मेळाव्याचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. समाजाचा विकास म्हणजे काही व्यक्तींच्या प्रगतीपुरता मर्यादित राहू नये, तर संपूर्ण समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा, हा या नव्या मंडळाचा उद्देश आहे. त्यामुळे सर्व समाजबांधवांनी नव्या संघटनेला पाठिंबा द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

या बैठकीत भारत मुरदुंडे, सुनील तोडकर डॉ चंद्रकांत लिगाडे, सदा मलाबादे, सुप्रिया मजले गीता कुरुंदवाडे सुरेंद्र माळी, रमेश तनवीरे कलगोंडा पाटील संजय नागुरे चिदानंद कोडगी बाळगोंडा पाटील गणेश तेलनाडे शशिकांत पाटील प्रवीण पाटील शिवगोंड पाटील शिवबसू खोत, बाबू पानारी, सुपुत्र चौगुले सचिन माळी शशिकांत निजे नागेंद्र पाटील अरुण कुंभार सुनील चिंगळे, शंकर बिल्लूर सचिन कोरे, सुरेश जमदाडे किरण स्वामी उमेश पाटील, राजु तारदाळे, बाळकृष्ण मिठारे, संतोष पाटील, सचिन मडिवाळ यांच्या सह मान्यवर मोठ्या संख्येने समाज बांधव उपस्थित होते.,



# आदिवासी वीर एकलव्य जयंतीनिमित्त समाज मेळावा

कोल्हार (ता. राहता) येथे आदिवासी वीर एकलव्य जयंतीनिमित्त आयोजित आदिवासी समाजाच्या मेळाव्यास उपस्थित राहण्याचा सन्मान मिळाला. यावेळी एकलव्य यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. उपस्थित समाजबांधवांशी संवाद साधत त्यांच्या विविध समस्या जाणून घेत मार्गदर्शन केले.

या प्रसंगी अध्यक्ष राजू बर्डे यांच्यासह कोल्हार भागातील प्रतिष्ठित ग्रामस्थ, माता-भगिनी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. विखे पाटील यांनी या वेळी महत्त्वपूर्ण घोषणा करत, मतदारसंघातील एक दिवस समाजबांधवांसाठी देण्याचा निर्णय घेतला. समाजातील प्रत्येक कुटुंबासाठी व्यक्तिशः उपलब्ध राहून त्यांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार व्यक्त केला. विशेषतः वंचित घटकांसाठी न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. आदिवासी समाजाला यापुढे घरकुल, रेशन कार्ड यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागणार नाही, असे स्पष्ट करत, समस्यांचे निवेदन दिल्यास तत्काळ कार्यवाही केली जाईल, असेही ते म्हणाले.

सत्कार न घेण्याचा निर्णय जोपर्यंत आदिवासी समाजाच्या समस्या सुटत नाहीत, तोपर्यंत कोणत्याही प्रकारचा सत्कार स्वीकारणार नाही, असा स्पष्ट निर्णय डॉ.विखे यांनी घेतला. समाजहितासाठी महामानवांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने प्रयत्न करावेत, असे आवाहन करत, समाजाला वंचित न राहू देता मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे ते म्हणाले.

समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी पुढाकार

कोल्हार भगवतीपुर येथून या चळवळीची सुरुवात करत आदिवासी समाजाच्या प्रत्येक घरापर्यंत जाऊन समस्या जाणून घेण्याचा संकल्प केला. समाजातील प्रश्न पूर्णतः सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध असून, समाजाच्या हितासाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

मुख्य प्रवाहात आणण्याचा संकल्प

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली काम केले जाणार आहे.



आज दिनांक २३/०२/२०२४ वार रविवार रोजी शासकीय विश्रामगृह, जालना येथे भारतीय बौद्ध महासभा जिल्हा स्थरीय व्यापक सभा घेण्यात आली त्या वेळी भारतीय बौद्ध महासभा चे महाराष्ट्र चे एस.के.भंडारे राष्ट्रीय उपाध्यक्ष,यु.जी.बोराडे,मा नरसिंगे साहेब, जालना जिल्हा अध्यक्ष मा महेंद्र बनकर, जिल्हा सरचिटणीस मा राजेश सदावर्ते,घनसावंगी चे माजी तालुका अध्यक्ष मा मधुकर खरात, मा. बापूराव वाघमारे साहेब, मॅनेजर तीर्थपुरी सर्जेराव शरणागत साहेब, जितेंद्र सदावर्ते असे अनेक पदाधिकारी उपस्थित होते तेव्हा, घनसावंगी तालुका माजी अध्यक्ष मधुकर खरात हें धम्म चळवळीत काम करत करत, आपली छोटीशी नोकरीं करत, आपला मोठा मुलगा याला सिव्हिल इंजिनियर बनवले आणि सिद्धार्थ खरात यांची जिल्हा परिषद पुणे, येथे सिव्हिल इंजिनियर म्हणून निवड झाली. त्या बद्दल भारतीय बौद्ध महासभा ची राज्य कार्यकरणी जिल्हा कार्यकरणी यांच्या वतीने सत्कार आयोजित करण्यात आला होता. तेव्हा महाराष्ट्र चे चीफ आणि जिल्हा अध्यक्ष मा बनकर सर यांनी सिद्धार्थ चा शाल आणि हार घालून स्वागत केलं. त्या वेळी जिल्ह्यातील सर्व च आजी माजी पदाधिकारी आणि समता सैनिक दलाचे सैनिक हजर होती.

# चंदुरला प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुलासाठी लाभार्थ्यांना मंजूरी पत्राचे वाटप

इचलकरंजी / संभाजी गुरव
(दै.महाभारत)

प्रत्येक व्यक्तीचे आपले हक्काचे घर असावे असे वर्षानुवषाचे स्वप्न असते. स्वतःच्या डोकीवर आपल्या हक्काचा निवारा असावा, अशी प्रत्येक गोरगरीब बेघर माणसाची इच्छा असते. ते स्वप्न व इच्छा प्रधानमंत्री आवास घरकुलाच्या माध्यमातून पूर्ण होत आहे. ही घरकुले शंभर दिवसांत पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी कुटुंबियांच्या जीवनात जो आनंद फुलेल ते अनमोल असेल, असे उद्गार आमदार राहुल आवाडे यांनी काढले. त्याबरोबर शासनाच्या वतीने राबविण्यात येणार्या सर्व योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न व्हावा, त्यापसून कोणीही वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

चंदुर (ता.हातकणंगले) येथे प्रधानमंत्री आवास योजना ग'ामीण टप्पा २ अंतर्गत चंदूर येथील बसवेश्वर मंगल कार्यालयात इचलकंरजी विधानसभा मतदारसंघातील चंदुर, कबनूर,





तारदाळ, खोतवाडी व कोरोची गावातील ३७८ पैकी ३५२ घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी पत्र आणि डीबीटीद्वारे पहिल्या हप्त्याचे वितरण आमदार डॉ. राहुल आवाडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी आमदार आवाडे बोलत होते. यावेळी पुणे येथील मु'य कार्यक'माचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. हातकणंगले पंचायत समिती व पाच गावांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक'म पार पडला.

पुढे बोलताना आमदार आवाडे यांनी, सर्वच योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत शंभर दिवसांत विनाअडथळा घरकुल पूर्ण करावे. घरकुल पूर्ण पूर्ण झाल्यानंतर वैयक्तिकरित्या लाभार्थ्यांना दहा हजार रुपये निधी दिला जाईल, असे जाहीर केले.

कार्यक'माची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी माजी सभापती महेश पाटील, सरपंच स्नेहल कांबळे, उपसरपंच योगिता हळदे सर्व ग'ामपंचायत सदस्य तसेच कबनूर कोरोची, खोतवाडी, तारदाळ गावचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, गटविकास अधिकारी शबाना मोकाशी, विस्तार अधिकारी रामन्ना, सहाय्यक गट विकास अधिकारी यु. के. महाले , श्रीमती शालन पाटील, धुळाप्पा पुजारी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

स्वागत सरपंच स्नेहल कांबळे यांनी तर प्रास्ताविक सहाय्यक गट विकास अधिकारी यू. के. महाले यांनी केले. हातकणंगले पंचायत समिती गटविकास अधिकारी शबाना मोकाशी यांनी, घरकुल संदर्भातील विविध योजना राबविण्यात येणार असून लाभार्थ्यांनी आपले हक्काचा निवारा घरकुलच्या रूपाने पूर्ण करावा. शासनाने घरकुल निधीमध्ये ५० हजार रुपयांची वाढ केली असून आता २ लाख १० हजार रुपये घरकुलासाठी निधी मिळणार आहे. शासनाने दिलेल्या वेळेत पूर्ण करून घ्यावे. तर या टप्प्यातील उर्वरीत २६ लाभार्थ्यांना कागदपत्रे पूर्ण झाल्यानंतर घरकुल योजनेचा लाभ दिला जाईल, असे सांगितले. सूत्रसंचालन सचिन हळदे, संजय जिंदे यांनी केले. आभार संदीप कांबळे यांनी मानले.

